MHNS130008592025

# निशाणी क्र. ०५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादींविरुध्द वाद मिळकत कोणत्याही मार्गाने कोणासही तबदील, हस्तांतरण करु नये याकरीता एकतर्फा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

(२). वादीचे असे कथन आहे की, मौजे रेडगांव, ता.निफाड शिवारातील शेतजमिन गट क्र. ३४ क्षेत्र ० हे ५६ आर पैकी १४ आर आणि ४२ आर, गट क्र.१८६ क्षेत्र पैकी ० हे ३२ आर आणि गट क्र.४२१ पैकी क्षेत्र ० हे १७ आर सदर मिळकत ही वाद विषय असुन यापुढे वाद मिळकत असे संबोधण्यात येते.

(३). वादीने पुढे कथन केले की, वर नमुद मिळकती हया मुळ पुरुष पुंजा खंडु केदारे यांच्याकडुन आलेल्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. वादी क्र.१ चे पती आणि वादी क्र.२ ते ५ चे वडील प्रकाश हे मयत झालेले आहेत. दावा मिळकती हया वादींच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत. दावा मिळकती हया एकत्र कुंटुबाचा प्रमुख म्हणुन भिमा पुंजा केदारे यांच्या नावे होत्या. भिमा मयत झाल्यानंतर प्रतिवादी यांनी संगनमताने वादींची नावे न लावता केवळ प्रतिवादी क्र. १ ते ३ आणि ५ यांचीच नावे महसुल अभिलेखात लावुन घेतली. प्रतिवादींच्या नावाचा गैरफायदा घेवुन त्यांनी दावा मिळकत गट क्र.३४ मधील ४२ आर क्षेत्र वादींच्या संमतीशिवाय प्रतिवादी क्र.४ बाबुराव यांना सन २०१७ साली विक्री केले. अशा प्रकारे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा प्रतिवादी क्र.४ यांना विक्री केलेला आहे. वादींनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा हिस्सा मागितला असता प्रतिवादींनी त्यास नकार दिला.

(४). प्रतिवादी क्र.१ ते ३ हे दावा मिळकतीस असलेल्या त्यांच्या नावाचा गैरफायदा घेवुन दावा मिळकत त्रयस्त इसमास विक्री करण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याच्या निकाला पावेतो वाद मिळकत हस्तांतरीत करु नये असा एकतर्फा तात्पुरता तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळावा अशी विनंती केली आहे.

(५). दावा मिळकतीमध्ये वादीचे हक्कसंबंध आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादीने शपथेवर कथन केले आहे की, वाद मिळकतीवर प्रतिवादी हे विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता पुढील क्लिष्टता टाळण्यासााठी दावा मिळकतीचे संरक्षण करणे आवश्यक ठरते. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**१.** प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वाद मिळकतीचे अधिकार अभिलेख पत्रकात त्यांच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादींनी वाद मिळकती कोणत्याही मार्गाने कोणासही तबदील करु नये, हस्तांतरीत करु नये असा तुर्तातुर्त तात्पुरता एकतर्फा मनाई हुकुम ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे कलम ९४(क) सह क्रम ३९ नियम ०३ च्या परंतुकानुसार*** पुढील तारखेपर्यंत देण्यात येतो.

२. तुर्तातुर्त तात्पुरता एकतर्फा मनाई हुकुम पुढे दाव्याच्या अंतिम निकालापर्यत कायम का करण्यात येऊ नये? याची कारणे दाखवण्यासाठी प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०५ यांना नोटीस काढावी.

३. वादीने स्पेशल बेलिफ भत्ता व अतिशीघ्र आदेशिका भरावी.

४. वादीने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम ०३अ*** अनुसार प्रतिवादी क्रमांक १ ते ५ यांना वादपत्र, प्रस्तुत व वादपत्रासोबतची दाखल सर्व कागदपत्रे नोंदणीकृत टपालाने पाठवावीत. वादीने सदर पुर्तता केल्याबाबत शपथपत्र सादर करावे.

५. वादीने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम ०३अ*** अनुसार ची पुर्तता केल्यावर एकतर्फा मनाई हुकुमाचा अनुज्ञालेख (रीट) द्यावी.

६. प्रस्तुत आदेशाने जर प्रतिवादी क्रमांक १ ते ५ व्यथित झाले असतील तर ते प्रस्तूत आदेश रद्द करण्यासाठी किंवा आदेशात फेरबदल करण्यासाठी नेमल्या तारखेपूर्वी न्यायालयात हजर राहून अर्ज करुन गुणदोषांवर चालवू शकतात. जर प्रतिवादींना नेमल्या तारखेपूर्वी उपरोक्तप्रमाणे अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी ते न्यायालयात हजर होऊन अर्ज कोणत्या तारखेला दाखल करणार आहेत ती तारीख व वेळ वादी किंवा त्याचे विधीज्ञांना रितसर नोंदणीकृत टपालाने, जातीने समक्ष अथवा अन्य मार्गाने कळवून तसा कळवल्याचा पुरावा दाखल करावा.

***(खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित)***

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.08.02 17:05:26 +0530

दिनांकः– ०२/०८/२०२५

(पी.डी.कोळेकर)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पिंपळगांव – बसवंत